## नियमित दिवाणी दावा क्र. ४२०/२०२२ मधील नि. १८ वरील आदेश.

(**CNR-MHAH** २३-००१२२५-२०२२)

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, दावा दाखल करतेवेळी वादी क्र.२ धिरज कुंजीर हा अज्ञान होता. परंतु तो आता सज्ञान झाल्यामुळे मुळ दाव्यातील शिर्षकामध्ये वादी क्र.२ धिरज कुंजीर याचे समोरील वादी क्र.३ अज्ञान पालनकर्ती असा शेरा वगळून वादी क्र.२ यास सज्ञान म्हणून दाव्यात समाविष्ट करण्याबाबत परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे. वादींचे म्हणण्यानुसार प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्याकरीता आवश्यक आहे. सदर दुरुस्ती झाल्यास वादी अथवा प्रतिवादी यांचे नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज.

२. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. सदर प्रतिवादीचे कथनानुसार, सदर अर्ज खरा व बरोबर नाही, अर्ज कायदेशीर नसून दावा दाखल करतेवेळी वादी क्र.२ हा सज्ञान होता. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे प्रतिवादीचे कथन आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | **...होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## **का र ण मि मां सा**

**वादप्रश्न क्र. १ व २ बाबत –**

**५.** वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी याचे विरुध्द जाहिर ठरावासाठी दाखल केला असून दावा दाखल करतेवेळी वादी क्र. २ नामे धिरज दादा कुंजीर यास अज्ञान दर्शविले असून त्याची अज्ञान पालनकर्ती आई वादी क्र.३ नामे सविता दादा कुंजीर असे नमूद करण्यात आले आहे. तसेच वादी यांच्यातर्फे निशाणी १७/१ लगत दाखल करण्यात आलेले आधारकार्डची प्रमाणित प्रत व निशाणी १७/२ लगत वादी क्र.२ याची शाळा सोडल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत यावरुन वादी क्र.२ याची जन्म तारीख दिनांक ०७/०२/२००५ असल्याचे दिसून येते. म्हणजेच वादी क्र. २ हा दिनांक ०७/०२/२०२३ रोजी सज्ञान झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत, वादी क्र. २ यास सज्ञान म्हणून दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. सबब, दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्याकरीता प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये होणे आवश्यक आहे. सबब, वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१. निशाणी १८ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.    निशाणी १८ येथील अर्जातील विनंतीनुसार वादींनी पुढील तारेखस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची प्रत प्रतिवादीस पुरवावी.

AMIT NAGESH KULKARNI
Digitally signed by AMIT NAGESH KULKARNI
Date: 2026.01.23 15:07:31 +0530

श्रीगोंदा.
दिनांक २३/०१/२०२६.

**(ए. एन. कुलकर्णी)**
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.